वर्ष- १२ अंक- २४ मुंबई, मंगळवार, २८ एप्रिल २०२६ ते ०४ मे २०२६ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

मूल्य २/- रुपये

PG|2

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

उन्हाळ्यात शिळं अन्न खाण्याचे ५ मोठे तोटे

3 → युरोपची अमेरिकेशी फारकत

नाशिकचा सुपुत्र हर्षल राजपूत यांची दमदार झेप; ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

सरळगाव येथे प्राचार्य श्री. गोरख ओंकार माळी यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा उत्साहात संपन्न !!!



सौजन्य- श्री विश्वनाथ राऊत सर

सरळगाव (ता. मुरबाड, जि. ठाणे) : पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ, भिवंडी संचलित सरळगाव विभाग हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे शाळेचे प्राचार्य श्री. गोरख ओंकार माळी यांच्या सेवापूर्तीनिमित्त भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन दिनांक २४ एप्रिल 2026 रोजी करण्यात आले. हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष सन्माननीय बी. डी. काळे सर ,आमदार मा. गोटीराम पवार साहेब, आमदार मा. निरंजन डावखरे साहेब उपस्थित होते. यावेळी संस्थेचे खजिनदार श्री. भोईर सर, उपाध्यक्ष श्रीराम भोईर साहेब, मा.के.बी घाटोळे सर, मा.सोण्या पाटी साहेब तसेच श्री.एन.एम भामरे मा.बी.एन पाटील सर मा.प्रशांत भामरे सर मा. दिपक पवार साहेब. मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्ष मा.मनिषा देसले मॅडम, शाळा समितीचे सदस्य मा. विष्णु पवार मा.राजेश झुंजारराव इ.यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमास संस्थेच्या विविध शाखांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी, सरळगाव शाळेचे सर्व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कारमूर्ती श्री. गोरख माळी सर यांनी आपल्या दीर्घ सेवाकाळात प्रामाणिकपणा, शिस्त आणि विद्यार्थ्यांप्रती असलेले प्रेम यामुळे शाळेची शैक्षणिक प्रगती साधली. त्यांच्या कायार्चा गौरव करताना मान्यवरांनी त्यांच्या योगदानाचे कौतुक केले व पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना माळी सरांच्या कार्यशैलीचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी सोहळ्याची रंगत वाढवली. शेवटी सत्कार, स्मृतिचिन्ह व शाल-श्रीफळ देऊन माळी सरांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेच्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने पार पडले. संपूर्ण कार्यक्रम भावनिक आणि प्रेरणादायी ठरला.

क्राइम ब्रँचची मोठी कारवाई, पायधोनी येथून बेकायदेशीर शस्त्र विक्रीप्रकरणी 5 जणांना अटक

मुंबई। खंडणी विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, काही इसम पायधुनी परीसरात विनापरवाना बेकायदेशिररित्या अग्निशस्त्र व काडतुसे विक्रीकरीता येणार आहेत. प्राप्त माहितीची शहानीशा केली असता, हॉटेल ॲलीगंट, रुम नं. ३०५, नारायण धुव स्ट्रिट, पायधुनी, मुंबई या ठिकाणी खंडणी विरोधी कक्षातील अधिकारी व अंमलदार यांनी छापा टाकला असता, सदर ठिकाणी ०५ इसम मिळुन आले. त्यांच्या ताब्यात ०३ पिस्टल मॅगझीनसह, ०३ मॅगझीन व २१ जिवंत काडतुसे मिळुन आली. त्यांच्याकडे मिळुन आलेल्या वर नमुद अग्निशस्त्र व काडतुसे यांच्या परवान्याबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याचे आढळुन आले. त्यांच्या ताब्यात मिळुन आलेली अग्निशस्त्रे व काडतुसे त्यांनी विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. सदर बाबत पायधुनी पोलीस ठाणे स वि.स्था.खं.क्र. ४८८/२०२६ कलम ३,२५ हत्यार कायदा सह कलम ३७ (१) (अ), १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्याची गुन्हे शाखेमध्ये गु.प्र.शा. वि. स्था.ख. क्र. ६८/२०२६ अन्वये पुर्न नोंद घेण्यात आली आहे. नोंद गुन्हयामध्ये खालील नमुद इसमांना अटक करण्यात आली आहे.

१) पुरुष वय २५ वर्षे राठी राजस्थान,
२) पुरुष वय २४ वर्षे राठी राजस्थान,
३) पुरुष वय १९ वर्षे राठी हरियाणा,
४) पुरुष वय २६ वर्षे राठी राजस्थान,
५) पुरुष वय २५ वर्षे राठी राजस्थान.



सदरची कामगीरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डि विशेष) श्री. सदानंद राणे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी प्रथकातील प्र.पो. नि. घनश्याम नायर, पो.निरी. सुनिल पवार, पो. निरी. अरुण थोरात, स.पो.निरी. विशाल मोहिते, स.पो.निरी. रुपेश पाटील व इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडलेली आहे.

पत्रकारांना मिळणाऱ्या धमक्यांप्रकरणी कारवाई; पत्रकार संघ कडून डोंगरी पोलिसांचे आभार

मुंबई। पत्रकारांना मिळणाऱ्या धमक्यांच्या पार्श्वभूमीवर आज डोंगरी पोलीस ठाण्यात Journalist Association च्या राष्ट्रीय अध्यक्षा ॲड. स्मिता चिपळूणकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भेट दिली. या प्रकरणात संबंधित गुन्हेगारांविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यामध्ये Journalist Act अंतर्गतही कलमे लावण्यात आली आहेत. याबाबत योग्य आणि तत्पर कारवाई केल्याबद्दल Journalist Association च्या वतीने डोंगरी पोलिसांचे आभार मानण्यात आले. तसेच, पत्रकारांच्या सुरक्षेसाठी अशा प्रकारची कारवाई पुढेही सुरू ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

गर्लफ्रेंडचं लग्न ठरलं, नाराज प्रियकराने होणाऱ्या नवऱ्याला पाठवले प्रायव्हेट फोटो

सूडबुद्धीने केलेली डिजिटल बदनामी आणि लग्नाचा बनाव

जयश्रीचे यापूर्वी श्रीशैल बदनूर नावाच्या एका तरुणासोबत प्रेमसंबंध होते. जेव्हा श्रीशैलला समजले की जयश्रीचे लग्न दुसरीकडे ठरले आहे, तेव्हा त्याला ही बाब सहन झाली नाही. तिला समजावून सांगण्याऐवजी किंवा तिचा आनंद स्वीकारण्याऐवजी त्याने तिला समाजात बदनाम करण्याचा नीच मार्ग निवडला. श्रीशैलने जयश्रीसोबतचे काही खाजगी फोटो ज्या तरुणाशी तिचे लग्न होणार होते, त्याच्या कुटुंबाला पाठवले. हे फोटो सासरच्या मंडळींच्या हाती पडताच त्यांनी कोणताही विचार न करता तात्काळ हे लग्न मोडण्याचा निर्णय घेतला. लग्नाचे ठरलेले नाते अशा प्रकारे तुटल्यामुळे जयश्रीला मोठा सामाजिक आणि मानसिक धक्का बसला. यामुळे ती पूर्णपणे खचून गेली होती.

मुंबई। प्रेमाचे रूपांतर जेव्हा विकृत मानसिकतेत होते, तेव्हा ते केवळ नातेच संपवत नाही तर एखाद्याचा जीव घेण्यासही कारणीभूत ठरते. कर्नाटकात एका सनकी प्रियकराच्या सूडबुद्धीमुळे एका 22 वर्षीय तरुणीला आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागले आहे. जयश्री बिरादर असे या दुदैर्वी तरुणीचे नाव असून, तिच्या लग्नाची सर्व तयारी घरात सुरू होती. तिच्या लग्नाचा शुभमुहूर्त आगामी 27 एप्रिल रोजी निश्चित करण्यात आला होता आणि साखरपुड्याचे सर्व विधी देखील आनंदाने पार पडले होते. मात्र, जयश्रीच्या आयुष्यातील एका जुन्या प्रकरणाने या आनंदाच्या वातावरणाचे रूपांतर दुःखात केले. ही हृदयद्रावक घटना कर्नाटकच्या विजयपुरा जिल्ह्यातील सिंदगी तालुक्यातील बंदल गावात घडली आहे. अपमानाच्या ओझ्याखाली विहिरीत उडी घेऊन आत्महत्या लग्नाचे नाते तुटल्यामुळे झालेला अपमान आणि सामाजिक बदनामीचे ओझे जयश्रीला सहन झाले नाही. या मानसिक त्रासामधून बाहेर पडणे तिला कठीण झाले आणि अखेर तिने टोकाचे पाऊल उचलण्याचे ठरवले. काल संध्याकाळच्या सुमारास जयश्रीने गावातील मदिना मशिदीजवळ असलेल्या एका विहिरीमध्ये उडी घेतली. ही बाब गावकऱ्यांच्या लक्षात येताच त्यांनी तिला वाचवण्यासाठी घटनास्थळी धाव घेतली, परंतु दुदैर्वाने तोपर्यंत तिचा मृत्यू झाला होता. तिच्या मृत्यूची बातमी समजताच संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. जयश्रीच्या कुटुंबातील सदस्यांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा असून त्यांनी या सर्व प्रकाराला जबाबदार असलेल्या श्रीशैल विरुद्ध कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. घटनेची माहिती मिळताच सिंदगी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेतला आणि तो उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला. सिंदगी पोलिसांनी या प्रकरणी तपास करून दिलेल्या माहितीनुसार, आरोपी श्रीशैल बदनूर याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत. डिजिटल डेटा आणि सोशल मीडियाचा वापर एखाद्याचे आयुष्य उद्ध्वस्त करण्यासाठी कसा केला जाऊ शकतो, याचे हे एक भीषण उदाहरण ठरले आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून फरार असलेल्या आरोपीला पकडण्यासाठी ठिकठिकाणी छापेमारी केली जात आहे. या घटनेने नात्यांमधील विश्वास आणि डिजिटल सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीरपणे समोर आणला आहे. या प्रकरणात पोलिसांकडून तपासाची माहिती देण्यात आली असून आरोपीला लवकरच बेड्या ठोकल्या जातील असे सांगण्यात आले आहे.

सासू, जावई अन् मुलीमध्ये 'त्या' गोष्टीवरुन वाद
सहा महिन्यांच्या बाळाला गच्चीवरुन फेकले खाली

मुंबई। माणुसकीला काळिमा फासणारी एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. पत्नीसोबत झालेल्या वादाच्या भरात एका निर्दयी बापाने आपल्या सहा महिन्यांच्या पोटच्या मुलाला घराच्या गच्चीवरुन खाली फेकून दिले. उत्तर प्रदेशाचील संभल जिल्ह्यातील ही घटना आहे. कुमकुम आपल्या भावाच्या लग्नासाठी माहेरी मलखानपूर येथे आली होती. तिचा भाऊ सौरभ याचे रविवारी लग्न असल्याने संपूर्ण घरात आनंदाचे वातावरण होते, मात्र या एका घटनेने लग्नाच्या घराचे रूपांतर स्मशानशांततेत झाले आहे. सासूच्या हातातून बाळाला हिसकावले मिळालेल्या माहितीनुसार, कुमकुमचा पती बाबी हा देखील या लग्नासाठी सासरवाडीला आला होता. शनिवारी (18 एप्रिल) रात्री साडेअकराच्या सुमारास बाबी दारूच्या नशेत होता आणि त्याचे पत्नीशी कोणत्यातरी कारणावरून कडाक्याचे भांडण झाले. हा वाद विकोपाला गेलेला पाहून कुमकुमची आई सुनीता या सहा महिन्यांच्या नातवाला, राघवला कडेवर घेऊन तिथे मध्यस्थी करण्यासाठी पोहोचल्या. मात्र, रागाच्या भरात असलेल्या बाबीने सासूच्या हातातील चिमुरड्याला हिसकावून घेतले आणि थेट छतावरून खाली रस्त्यावर फेकून दिले. सिमेंटच्या रस्त्यावर आदळला राघव सहा महिन्यांचा राघव डोक्याच्या बाजूने थेट सिमेंटच्या रस्त्यावर आदळल्याने त्याचा जागीच दुदैर्वी मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून आनंदाने न्हाऊन निघालेल्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बालकाचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. आरोपी पित्याचे हे क्रूर कृत्य पाहून संपूर्ण गावाकडून संताप व्यक्त केला जात आहे.



संकेत

पोलीस तपास काय सांगतो?

याप्रकरणी पोलीस निरीक्षक कमलेश कुमार मिश्रा यांनी सांगितले की, पती-पत्नीमधील वैयक्तिक वादातून ही घटना घडली आहे. दारूच्या नशेत असलेल्या पित्याने आपल्याच मुलाचा जीव घेतला असून पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. अद्याप कुटुंबाकडून कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही, मात्र पोलीस कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत असून आरोपीवर कठोर कारवाई करण्याचे देण्यात आले आहेत.

पोलीस असल्याचे सांगून पालघरमध्ये फसवणूक करणारा आरोपी जेरबंद

पालघर। पोलीस असल्याचे भासवून ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक करर्णाया आरोपीस अटक करण्यात मनोर पोलिसांना यश आले असून, त्याच्याकडून चोरीस गेलेले सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.15 एप्रिल 2026 रोजी सकाळी सुमारे 11.20 वाजता दामोदर काशिनाथ चाफेकर (वय 71, रा. मनोर रईसपाडा) हे मनोर मच्छीमार्केट येथे खरेदीसाठी गेले होते. खरेदी करून परत येत असताना विठ्ठल मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ दोन अनोळखी इसमांनी त्यांना अडवले. त्यातील एकाने स्वतःला पोलीस असल्याचे सांगत परिसरात चोरीच्या घटना घडत असल्याचे कारण देत सोन्याचे दागिने घालून फिरल्यास दंड होतो, असे सांगितले.



यानंतर दुर्सया इसमाने विश्वास संपादन करत चाफेकर यांच्या गळ्यातील सोन्याची चैन व हातातील अंगठी काढून देतो असे भासवले. दागिने कागदात गुंडाळून परत पिशवीत ठेवत असल्याचा बहाणा करत हातचलाखीने ते दागिने लंपास करण्यात आले. या प्रकरणी मनोर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता 2023 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक यतिश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले. सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे तपास करत झायेद जावेद जाफरी (वय 38, रा. मानी मंगलनगर, आंबिवली, ता. कल्याण, जि. ठाणे) यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली.17 एप्रिल रोजी आरोपीस अटक करण्यात आली असून त्याच्याकडून 1 लाख 45 हजार रुपये किंमतीची सोन्याची चैन व अंगठी असा 100 टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. न्यायालयाने आरोपीस 21 एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्यात इतर साथीदारांचा सहभाग असल्याची शक्यता असून पुढील तपास सुरू आहे.

पोलीस बातमी पत्र

विविध

२

मुंबई, मंगळवार,२८ एप्रिल २०२६ ते ०४ मे २०२६

उन्हाळ्यात शिळं अन्न खाण्याचे ५ मोठे तोटे

बिझी शेड्यूल असल्यामुळे अनेक लोक एकत्र अन्न शिजवून वेळोवेळी फ्रीजमधून काढून वापरत असतात. तसे तर असे करणे योग्य नाही, तरी उन्हाळ्यात याबद्दल विशेष काळजी घेण्याची गरज असते. शिळ्या पदार्थांमध्ये बॅक्टेरिया वाढू लागतात आणि यामुळे आरोग्यावर वाईट परिणाम दिसून येतात.

किती वेळ पूर्वी तयार जेवण करणे योग्य ठरेल, असा प्रश्न आपल्या मनात असेल तर डॉक्टरांप्रमाणे चार ते पाच तास पूर्वी तयार अन्न खायला हरकत नाही, परंतु याहून अधिक वेळेपूर्वी तयार पदार्थ खाणे आपल्या आरोग्यासाठी योग्य ठरणार नाही. कापलेले फळ आणि भाज्या तर मुळीचं वापरू नये. याचे नुकसान जाणून घ्याः

कर्करोगाचा धोका

शिळं अन्न पोटातील कर्करोगाचा धोका निर्माण करतं. यातून आढळणारे बॅक्टेरियामुळे हायड्रोकार्बन आणि कॅन्सरचा धोका वाढतो.

ताप येणे

बॅक्टेरिअल इन्फेक्शनमुळे ताप येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पोटदुखी

शिळं अन्न खाल्ल्याने पोटात गॅस, ॲसिडिटी आणि पोटदुखी सारख्या समस्या झेलाव्या लागू शकतात. फ्रीजमध्ये गार झालेले अन्न खाल्ल्याने देखील पोटदुखीची तक्रार होते.

फूड पॉइजनिंग

उन्हाळ्यात तापमान अधिक असल्यामुळे खाद्यपदार्थांमध्ये बॅक्टेरिया लवकर पसरू लागतात. एक ते दोन तासांतच कीटाणूंची संख्या तिप्पट वाढते ज्यामुळे फूड पॉइजनिंग आणि लूज मोशनसारख्या समस्या उद्भवतात.

अतिसार

पचनतंत्र आणि प्रतिरक्षातंत्र कमजोर झाल्यामुळे उन्हाळ्यात शिळं अन्न सेवन केल्याने अतिसारचा धोका उद्भवू शकतो. यामुळे लूज मोशन, उलट्या, ताप देखील होऊ शकतो. अनेकदा शरीरात पाण्याच्या कमीमुळे धोका निर्माण होतो. फ्रीजमध्ये ठेवलेले डेअरी प्रॉडक्ट्स देखील अधिक दिवसापर्यंत वापरू नये. दूध उकळल्यावर ते त्याच दिवशी संपवावे.



अपचन : घरच्या घरी मिळवा असा आराम

वेळीअवेळी अरबट चरबट खाणे, अति तेलकट, जड पदार्थांचे वारंवार सेवन, अपुरी झोप, पोट साफ न होणे, दीर्घकाळ काहीही न खाणे यामुळे अपचन होते आणि त्याचा परिणाम म्हणजे पोटात जळजळ, करपट ढेकर, पोटदुखी, पोट फुगणे, उलटी, जुलाब अशी लक्षणे दिसू लागतात. थंडीच्या तुलनेत उन्हाळ्यात अपचन होण्याचे प्रमाण अधिक असते.

अपचन अति खाण्यापिण्यामुळे झाले असेल तर त्यावर काही घरगुती उपचार जरूर करावेत. त्याने बराच आराम मिळतो. अपचनाचा त्रास होऊ लागला की घरात वेलदोडा असतो, त्याची कुटून पूड करावी आणि अर्धा चमचा पूड खडीसाखरेबरोबर घ्यावी. वेलदोडा पाचक आहे. तसेच तीन चिमूट जायफळ पूड आणि दोन चमचे लिंबू रस दररोज घेतल्यास ज्यांना नेहमी अपचन होते, त्यांची समस्या दूर होते.

धणेपूड आणि सुंठ यांचे मिश्रण पचनासाठी फार मदतगार ठरते. दोन चमचे धणेपूड, अर्धा चमचा सुंठ दोन ग्लास पाण्यात घालून उकळून थंड करावे. हे पाणी २-२ चमचे तीन वेळा घ्यावे. सुंठ आणि बडीशेप पचन सुधारण्यास मदत करणारे आहेत. पाव चमचा सुंठ, १चमचा बडीशेप आणि थोडी खडीसाखर सकाळ, दुपार, संध्याकाळ चावून खावी.

पोट फार दुखत असेल तर ओवा तव्यावर भाजून चावून खावा. त्यावर थोडे कोमट पाणी प्यावे. आल्याचा रस आणि सैंधव व थोडे हिंग यांचे चाटण करून ते घ्यावे. आल्याचे नुसते तुकडे चावून खावेत. हिंग पोट विकारांवर अतिशय उत्तम गुणकारी असून त्यामुळे गॅस कमी होण्यास मदत मिळते. हिंग कोमट पाण्यात घालून प्यावे किंवा पूड पोटावर चोळावी. सकाळी पिकलेले केळे खाल्ल्यानेही पचन सुधारते.

पारिजातकाच्या फुलांचे आश्चर्यकारक फायदे

◆ **ताण कमी करते :** पारिजातकाच्या फुलांमध्ये ताण दूर करण्याची शक्ती असते. जीवनात हे फूल आनंद पसरवते. त्याच्या सुगंधामुळे मेंदूला शांतता मिळते.

◆ **थकवा निवळतो :** पारिजातकाची फुले रात्रीच्या वेळी उमलतात आणि सकाळी कोमेजतात. अशी आख्यायिका आहे की पारिजातकाला स्पर्श मात्र केल्यानेच अंगातला सर्व थकवा दूर होतो.

◆ **चिरतारुण्य :** पौराणिक कथेनुसार पारिजातकाच्या झाडाला स्वर्गातून पृथ्वीवर आणल्याचे मानले जाते. नरकासुराच्या वध केल्यावर श्रीकृष्ण स्वर्गात गेले असताना इंद्राने त्यांना पारिजातकाचे फूल दिले. कृष्णाने ते फूल देवी रुक्मिणीला दिले. देवी सत्यभामेला देवलोकाची देवमाता आदितीने नेहमी चिरतारुण्य राहण्याचा वर दिला. तेवढ्यात नारद तिथे आले आणि त्यांनीही सत्यभामेला पारिजातकाची महती सांगितली. त्या प्रभावामुळे देवी रुक्मिणी पण चिरतारुण्यवती झाली. सत्यभामेला हे कळल्यावर ती क्रोधीत झाली. तीने श्रीकृष्णाकडून पारिजातक वृक्ष घेण्याचा आग्रह धरला. अशी आख्यायिका आहे की, पारिजातकाच्या वृक्षाचा उगम समुद्रमंथनाच्या वेळेस झाला होता; ज्याला इंद्राने आपल्या बागेत लावला होता.

◆ **हृदयविकारावर फायदेशीर :** पारिजातक हृदयविकारामध्ये फायदेशीर असते. १५ ते २० फुलांचा रस घेणे हृदयासाठी फायदेशीर असते. हृदयरोग रोखण्यासाठी हा एक प्रभावी मार्ग आहे. हा उपाय डॉक्टरांच्या सल्ल्याने करायला हवा.

उभ्याने करताय पाण्याचे सेवन; आजच सोडा ही सवय

पाण्याचे सेवन करणे आरोग्यासाठी लाभदायक आहे. मात्र, बऱ्याचदा आपण बाहेरुन कुठूनही आलो की, फ्रिजचा दरवाजा उघडतो आणि तोंडाला पाण्याची बॉटल लावतो. मात्र, असे उभ्याने पाणी पिणे आरोग्यासाठी हानीकारक आहे. यामुळे आजार आपण ओढावून घेतो. चला तर जाणून घेऊया उभ्याने पाणी पिण्याचे तोटे.

किडनीत संसर्ग होऊ शकतो

उभ्याने पाणी प्यायल्यास ते पाणी शरीरातून थेट वाहून जाते. यामुळे त्याचा शरीराला विशेष फ्कायदा होत नाही. तसेच उभ्याने पाण्याचे सेवन केल्याने ते वेगाने वाहून जाते. यामुळे किडनी आणि मूत्राशयातील घाण तशीच राहते. त्यामुळे मूत्रमार्ग किंवा किडनीत संसर्ग होऊ शकतो.

शरीरातील पदार्थ पचत नाहीत

उभे राहून पाणी प्यायलास शरीराला त्याचा फ्कारसा उपयोग होत नाही. त्याऐवजी बसून पाणी प्यायल्यास तुमचे स्नायू आणि मज्जासंस्थेवर जास्त ताण नसल्याने पाण्याबरोबर शरीरातील इतर पदार्थही पचण्यास मदत होते.

स्थायूंवर दाब पडतो

उभ्याने पाण्याचे सेवन केल्याने अन्ननलिकेच्या खालील भागावर जोरदार आघात होतो. त्यामुळे पोट आणि अन्ननलिकेला जोडणाऱ्या स्थायूंवर दाब पडतो आणि त्याला इजा पोहचण्याचा धोका असतो.

पोटात जळजळ होते

पाणी पोटात वेगाने येत असल्याने आम्लाची हलचाल वेगाने होते आणि ॲसिडीटीचा त्रास होतो.

तहान पूर्णपणे भागत नाही

उभं राहून पाणी प्यायल्यास तुम्हाला सतत थोड्या थोड्या वेळाने पाणी प्यावेसे वाटते. कारण उभं राहून पाणी प्यायल्याने तहान कधीच पूर्णपणे भागत नाही. त्यामुळेच निवांत एका जागी बसून पाणी प्यायल्यास तहान पूर्णपणे भागते.

कधीतरी उपमा जास्त होतो आणि उरतो. मग तो गारगुट्ट उपमा कोणीच खात नाही. काही वेळा ताजा उपमाही उरतो. कारण तो दडदडीत किंवा घट्ट होतो जो अजिबात खाल्ला जात नाही. अशा वेळी हा उपमा फुकट घालवण्यापेक्षा त्यापासून एक भन्नाट नाश्त्याचा पदार्थ बनवला तर...

उपमा कटलेट्स



साहित्य - उरलेला उपमा १ वाटी (त्यात काजू असतील तर काढून टाका.) उकडलेला आणि किसलेला बटाटा अर्धी वाटी, चाट मसाला, आवडीप्रमाणे तिखट, थोडा ओवा, मीठ, साखर.

कृती - सर्व साहित्य एकत्र करून घ्यावे. लक्षात ठेवा मिश्रण पातळ नको तर घट्ट हवं. त्याचे छोटे छोटे गोळे अथवा टिक्की करून आवडीप्रमाणे तळून किंवा भाजून घ्यावे. याच्या टिक्की किंवा कटलेट नीट वळता येत नसतील तर अर्धा तास ते मिश्रण फ्रीजमध्ये उघडे ठेवावे.



आपल्या चेहऱ्याची काळजी घेताना चेहरा नेहमी सुंदर आणि त्वचा नितळ, चमकदार राहावी, अशी इच्छा केवळ स्त्रियांनाच नाही, तर पुरुषांनाही असते. त्यामुळे 'फेशियल', किंवा फेशियल क्लीनअप व मसाज ही थेरपी लोकप्रिय आहे. चेहऱ्याचे सौंदर्य वाढवण्याबरोबरच चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करत त्वचेवरील मृत पेशी, ब्लॅक हेड्स आणि व्हाईट हेड्स नाहीसे करण्याचे काम फेशियल थेरपी करत असते. मात्र ही थेरपी घेताना योग्य काळजी घेतली गेली नाही, तर चेहऱ्याला नुकसान होण्याची शक्यताच अधिक असते. त्यामुळे फेशियल थेरपी निवडताना काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

फेशियल करताना अशी घ्या काळजी

काही लोकांची त्वचा तेलकट असते. अशा व्यक्तींना चेहऱ्यावर मुरुमे अधिक येत असतात. अशा व्यक्तींच्या फेशियल थेरपीसाठी तेलयुक्त क्रीम्स वापरली गेली, तर त्वचा अधिक तेलकट होऊन मुरुमे वाढू शकतात. तेलयुक्त क्रीम्स वापरली गेल्याने त्वचेवरील रंध्रे बंद होऊन पिंपल्स येण्याचे प्रमाण वाढू शकते. तेलकट त्वचा असणाऱ्या व्यक्तींनी फेशियलसाठी वॉटर बेस्ड क्रीम्सचा वापर करणे चांगले. फेशियल थेरपीसाठी वापरण्यात येणारे प्रोडक्ट आपल्या नेहमीच्या वापरातील नसून, नवे असल्यास त्याची 'पॅच टेस्ट' करून पाहणे चांगले. या टेस्टद्वारे आपण वापरणार असलेल्या क्रीमचे कोणत्याही प्रकारचे दुष्परिणाम आपल्या त्वचेवर होणार नाहीत याची खात्री आपल्याला करून घेता येते. ही टेस्ट करण्यासाठी थोडेसे क्रीम आपल्या मनगटाच्या आतील बाजूस लावून पाहावे. चोवीस तासांच्या नंतर या क्रीमचा कोणताही दुष्परिणाम जाणवला नाही, तरच हे क्रीम चेहऱ्यावर लावण्यास योग्य आहे, असे समजून त्याचा फेशियल थेरपीसाठी वापर करावा. फेशियल थेरपी एखाद्या ब्युटी सलोनमध्ये किंवा पार्लरमध्ये जाऊन करणार असल्यास तेथील स्वच्छता, फेशियलच्या दरम्यान वापरण्यात येणारे टॉवेल, नॅपकिन, स्टीमर आणि इतर उपकरणे स्वच्छ असल्याची खात्री करून घेणे आवश्यक आहे. जर या वस्तू स्वच्छ आणि निर्जंतुक केलेल्या नसतील तर त्याद्वारे त्वचेला इन्फेक्शन होण्याचा धोका असतो. तसेच फेशियल करताना आपल्यासाठी वापरण्यात येणारे फेशियल कीट संपूर्णपणे नवीन आणि आधीपासून वापरलेली नाही याची खात्री करून घ्यावी. आजकाल फेशियल कीटमध्ये सर्व प्रसाधने लहान लहान पाऊचेसमध्ये उपलब्ध असल्याने प्रोडक्ट आधी वापरले गेले आहे किंवा नाही याची सहज खात्री करून घेता येते. फेशियलसाठी वापरण्यात येणाऱ्या अनेक प्रसाधानांमध्ये किंवा क्रीम्समध्ये अनेक प्रकारची रसायने असतात. या रसायनांमुळे त्वचा कोरडी होणे, त्वचेला खाज सुटणे, त्वचा लालसर होणे, अशा समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे फेशियलसाठी शक्यतो संपूर्णपणे नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे केव्हाही चांगले. फेशियल थेरपी केल्यानंतर उन्हामध्ये बाहेर पडणे किंवा साबणाचा वापर टाळावा. फेशियल थेरपीनंतर त्वरित सौंदर्यप्रसाधनांचा वापरही करू नये. फेशियल केल्यानंतर त्वचेची रंध्रे खुली असतात. त्यामुळे सौंदर्य प्रसाधानांमधील रसायने या रंध्रांच्या वाटे त्वचेच्या आत शिरून त्वचेचे नुकसान करू शकतात. फेशियलनंतर चेहरा धुण्यासाठी साबण किंवा फेसवॉशचा वापर न करता केवळ थंड पाण्याने चेहरा धुवावा.



घरचा वैद्य
जाणून घ्या ५ उपाय

▮ **कांदा** - कानाच्या वेदनेमुळे त्रस्त आहात, तर घाबरण्यासारखे काही नाही. कांद्याच्या रस काढून कापसाच्या मदतीने कानात दोन ते तीन थेंब टाका. काही वेळातच आराम मिळेल.

▮ **हळद** - शारीरिक वेदनांपासून मुक्ती मिळवण्यासाठी गरमागरम दुधात हळद मिसळून सेवन करा. याव्यतिरिक्त तेल आणि हळद गरम करून शरीरावर लावल्यानेही लाभ मिळेल.

▮ **लसूण** - हे ॲंटीबॅक्टेरिअल आणि ॲंटी इंफ्लेमेटरी तत्त्वाने भरपूर औषधी आहे, ज्यामुळे उष्णताही प्राप्त होते. शारीरिक वेदनेत लसूण सर्वोत्तम विकल्प आहे. याव्यतिरिक्त कानात वेदना होत असल्यास लसणाच्या तेलाचे काही थेंब टाकल्याने आराम मिळतो.



▮ **लवंग** - दातदुखीवर लवंग सर्वोत्तम उपाय आहे. भाजलेल्या लवंगाची पेस्ट किंवा लवंग तेल कापसाने दाताला लावल्याने वेदनांपासून मुक्ती मिळेल.

▮ **दालचिनी** - याने विशेषतः महिलांना मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या त्रासापासून मुक्ती मिळते. अधिक रक्तस्राव होत असल्यास दालचिनी लाभकारी ठरेल. केवळ दालचिनी टाकून चहा बनवा किंवा तयार चहामध्ये दालचिनी पावडर टाकून सेवन करा.

उन्हाळ्यात सोडा, पॅक्ड ज्यूस वगळून केवळ प्या पाणी



वजन कमी होतं

हल्लीच्या लाइफस्टाइलमध्ये सगळे वाढत असलेल्या वजनामुळे परेशान असतात. अशात वजन कमी करण्यासाठी शुगर असलेले पेय पदार्थ न पिता केवळ पाणी पिणे योग्य ठरेल. याने अधिक प्रमाणात कॅलरी बर्न होण्यात मदत मिळेल.

चयापचय क्षमता वाढेल

केवळ पाणी पिण्याने आपली चयापचय क्षमता वाढेल आणि यामुळे ऊर्जेचे स्तरदेखील. म्हणून दिवसभर खूप पाणी प्या. या व्यतिरिक्त अधिकाधिक पाणी पिण्याने आपल्याला ध्यान केंद्रित करण्यात देखील मदत मिळेल.

खाण्यावर नियंत्रण

आपली डाएट घेल्यानंतरही आपल्याला भूक जाणवत असेल तर केवळ एक ग्लास पाणी प्यावे. याने वजन नियंत्रित करण्यात मदत मिळेल. अनावश्यक कॅलरीज कमी करण्यासाठी पाणी पीत राहावे.

विषारी पदार्थ शरीरातून बाहेर काढते

अधिक पाणी पिण्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. ज्यामुळे त्वचेचे आरोग्य उत्तम राहते आणि वय वाढले तरी तारुण्य टिकून राहते. या व्यतिरिक्त अनेक आजार हाय ब्लड प्रेशर, हृदयासंबंधी आजार आणि अपचन सारखे आजार होण्याचा धोका टळतो.

ब्युटी प्रॉडक्ट्सपेक्षा हेल्दी डायट आवश्यक

उन्हाळ्यात घरातून बाहेर निघण्यापूर्वी सनस्क्रीन लावण्याचा सल्ला दिला जातो. उन्हात नाजूक त्वचेवर जळजळ होते आणि लाल डागदेखील पडू शकतात. अशात आज आम्ही आपल्याला असे काही उपाय सांगत आहोत ज्यामुळे त्वचेचं आरोग्य चांगले राहील आणि सौंदर्यप्रसाधने प्रॉडक्ट्सवर निर्भरता कमी.

त्वचेच्या आरोग्यासाठी ब्युटी प्रॉडक्ट्सपेक्षा हेल्दी डायट अधिक आवश्यक आहे. त्वचेचं तारुण्य टिकून राहावं म्हणून प्रोटीन आणि व्हिटॅमिन सी अत्यंत आवश्यक आहे. याने त्वचेवर एक सुरक्षा परत तयार होते.

योग्य आहार

बीन्समध्ये जिंक आणि हायड्रोलिक ॲसिड आढळत ज्याने त्वचेत कोलाजन पातळी राखण्यास मदत मिळते.

▮ गाजरामध्ये व्हिटॅमिन्स ए भरपूर प्रमाणात आढळतं. याचे सेवन केल्याने पिंपल्स, पुरळ यासारख्या समस्या दूर होण्यास मदत मिळते. सोबतच त्वचेत रक्त संचार योग्यरीत्या होतं.

▮ शाईनी स्कीनसाठी आहारात ओमेगा-३ फॅटी ॲसिड



सामील करावे. मासे सेवन करणे त्वचा आणि केस दोघांसाठी फायदेशीर ठरतं.

▮ ब्लूबेरीमध्ये अधिक प्रमाणात ॲंटीऑक्सिडेंट्स आढळतं. ब्लूबेरीजचे सेवन केल्याने त्वचा खूप काळ सॉफ्ट राहते. याने हृदयासंबंधी तसेच कर्करोग यासारखे आजारदेखील टाळता येऊ शकतात.

▮ उन्हाळ्यात आपल्या आहारात लाल सिमला मिरच्या, टोमॅटो आणि स्ट्रॉबेरीज सामील करा. याने त्वचेचं आरोग्य राखण्यास मदत मिळते.

संपादकीय

युरोपची अमेरिकेशी फारकत



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



इराणविरोधातील युद्धात अमिरेसोबत युरोप नाही आहे. याचा अर्थ शक्ती असूनही ती प्रभावीपणे प्रदर्शित करण्याच्या प्रयत्नात ट्रम्प अपयशी ठरले आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर मार्शल प्लॅनच्या माध्यमातून जागतिक स्थैर्य आणि सुरक्षिततेसाठी अमेरिकेने युरोपच्या पुनर्बांधणीत पुढाकार घेतला होता. अमेरिका आणि युरोपमध्ये केवळ सामायिक मूल्येच नाहीत; तर इतिहासानेही या दोन्ही भौगोलिक प्रदेशांना एकत्र जोडले आहे. अमेरिकेचे जगभर लष्करी तळ असून प्रत्येक राष्ट्राशी राजनैतिक संबंध देखील आहेत, ज्यांचा वापर युरोपीय देशांच्या संरक्षणासाठी अमेरिकेने अनेक वेळा केला आहे. युरोपीय संघाशी एकत्रितपणे व्यवहार करणे कठीण असले तरी अमेरिका आपली जबाबदारी टाळू शकत नाही, हे पूर्वापार चालत आलेले गृहीतक ट्रम्प यांच्या राजवटीत मोडीत निघाल्याचे दिसते. पॅरिस हवामान करारातून अमेरिकेने माघार घेतल्यामुळे युरोपीय संघाशी मतभेद वाढलेले असतानाच ॲल्युमिनियम आणि इतर धातूंवर लादलेल्या व्यापार शुल्कामुळे ही नाराजी अधिकच तीव्र झाली. ट्रम्प यांच्या चिथावणीखोर भूमिकांना किती प्रमाणात प्रतिसाद द्यायचा, याबाबत युरोपीय देश ठोस रणनीती निश्चित फॉर्वर्ड डिटर्न्सच्या माध्यमातून संरक्षणाची जबाबदारी स्वतःच उचलावी आणि त्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करावी, अशी भूमिका आता जर्मनीसारखे देश घेत आहेत. गेल्या २५ वर्षांत जागतिक निर्यातीत युरोपचा वाटा १० टक्क्यांनी घसरला असून, नेमकी तेवढीच वाढ चीनने नोंदवली आहे. युरोपियन युनियनसोबतच्या व्यापारात चीनने आता अमेरिकेलाही मागे टाकले आहे. २००३ मध्ये चीन आणि युरोपियन युनियनमधील व्यापार १५० अब्ज डॉलर होता, जो आता ७०० अब्ज डॉलरवर पोहोचला आहे. दुसरीकडे, याच काळात अमेरिकेसोबतचा व्यापार ३५० अब्ज डॉलर्सवरून ६५० अब्ज डॉलर्सपर्यंत मर्यादित राहिला आहे. गेल्या वीस वर्षांत अमेरिकेच्या तुलनेत युरोपने चीन, आसियान आणि इतर बाजारपेठांशी आपला व्यापार अधिक विस्तारला आहे. युरोपसाठी चीन हा एक व्यवस्थापकीय प्रतिस्पर्धी असला, तरी त्याला व्यापारी भागीदार म्हणून स्वीकारण्यासाठी आता युरोपीय देश प्रयत्नशील आहेत. इंग्लंडच्या पंतप्रधानांनी तीन दशकांनंतर अलीकडे दिलेली चीनला भेट दिली, हे याच बदलत्या धोरणाचे प्रतीक आहे. युरोपीय देशांना रशियापासून मोठा धोका असून, जर अमेरिका त्यांना संरक्षण देऊ शकत नसेल, तर त्यांच्यासाठी अमेरिकेची उपयुक्तता कमी होते. सध्या ऊर्जा सुरक्षा ही युरोपपुढील सर्वात मोठी असुरक्षितता बनली आहे. PESCO सारख्या उपक्रमांद्वारे युरोप लष्करीदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्नशील आहे. फ्रान्सने तर युरोपीय सैन्य उभारण्याची संकल्पनाही मांडली आहे. २०१८ मध्ये अमेरिकेने इराण अणू करारातून माघार घेतली होती, मात्र त्या वेळी युरोपीय संघाने 'INSTEX' नावाची यंत्रणा उभारून इराणशी आपला व्यापार सुरू ठेवला. युद्ध टाळून अण्वस्त्रांचा प्रसार रोखणे, हा त्यामागचा उद्देश होता. अमेरिकेने इराणशी पुकारलेल्या संघर्षाचा सर्वाधिक फायदा रशियाला झाला. मध्य आशियात तणाव निर्माण झाल्यास तेलाचे दर वाढतात, ज्यामुळे युरोपीय देशांना आर्थिक फटका बसतो. तसेच, या भागातून होणाऱ्या स्थलांतरामुळे युरोपातील देशांची सामाजिक वीण विस्कळीत होत असल्याने त्यांची राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात येते. लोकशाही मूल्ये आणि स्थलांतराच्या मुद्द्यांवरून पूर्व आणि पश्चिम युरोपीय देशांमध्ये मतभेद दिसतात. जर्मनी व ग्रीससारख्या देशांत आर्थिक तफावतदेखील आहे. गटबाजीमुळे युरोपीय संघाला एकजुटीने ठोस धोरणे आखणे कठीण जाते.

२००३ मध्ये जेव्हा जॉर्ज बुश यांनी इराकविरोधात लष्करी कारवाईची भूमिका घेतली, तेव्हाच युरोपमध्ये उभी फूट पडल्याचे पाहायला मिळाले होते. त्या वेळी ब्रिटनचे टोनी ब्लेअर यांसारख्या नेत्यांनी बुश यांच्या भूमिकेला पाठिंबा देणे आपले कर्तव्य समजले होते. मात्र सध्याच्या इराण-इस्रायल युद्धाच्या बाबतीत तशी विनाशकारी चूक पुन्हा होऊ नये, अशी भूमिका इंग्लंडने घेतली आहे. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी अमेरिकेच्या हल्ल्याचा विरोध केला असला तरी, या परिस्थितीत आपण काहीही करू शकत नाही, अशी हतबलता व्यक्त केली आहे. पोलंडला स्वतःच्या सुरक्षेसाठी आजही अमेरिकेची साथ हवी आहे, तर रशियासोबत सुरू असलेल्या युद्धात मध्यस्थी करण्यासाठी युक्रेनला अमेरिकेची मदत अनिवार्य वाटत आहे. मेलोनी, बोरिस जॉन्सन आणि हंगेरीचे व्हिक्टर ऑर्बन हे नेते ट्रम्प यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. आजच्या घडीला युरोपला अँजेला मर्केल यांच्यासारख्या खंबीर नेतृत्वाची गरज आहे. कोणत्याही आंतरराष्ट्रीय प्रश्नावर युरोपीय देशांमध्ये पडणारी ही फूट त्यांची सर्वांत कमकुवत बाजू ठरते. चीन आणि अमेरिकेप्रमाणे युरोप आज महाशक्ती राहिलेला नाही, याची जाणीव युरोपीय देशांनी ठेवणे गरजेचे आहे. चीन आणि रशिया यांच्याशी एकट्याने संतुलन राखणे युरोपसाठी कठीण आहे. संरक्षण क्षेत्रात स्वावलंबी होण्यासाठी युरोपला अजून काही दशके लागतील. अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण या युद्धामुळे युरोपची स्थिती अधिक हतबल झाली आहे. अमेरिकेच्या युद्धखोर धोरणांचा निषेध करण्यासाठी खुद्द अमेरिकेप्रमाणेच युरोपातील नागरिकही मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले आहेत. युरोपीय देश इराणविरुद्धच्या युद्धात अमेरिकेला साथ देणार नसतील, तर अमेरिकेनेही त्यांच्या संरक्षणासाठी उभे राहण्याची गरज नाही, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे. युक्रेनचे युद्ध हे आमचे युद्ध नाही, असे विधान करून ट्रम्प युरोपला रशियाची भीती दाखवत आहेत. त्याला प्रत्युत्तर देत नाटो सदस्य देशांनी या युद्धात सहभागी होण्यास नकार दिला आहे. स्पेनने आपल्या रोटा आणि मोरोन या लष्करी तळांचा वापर अमेरिकेला करू दिला नाही. इराणविरुद्धच्या संघर्षाला अमेरिकेचे वैयक्तिक युद्ध मानून युरोपीय देश आपली अर्थव्यवस्था आणि प्रादेशिक सुरक्षा धोक्यात घालण्यास तयार नाहीत. इतिहास पाहता, संघर्ष दीर्घकाळ ओढला गेला की अमेरिकेची फसगत होते. मग तो व्हिएतनाम विरुद्धचा असो वा इराक. इराणवर आक्रमण करताना अमेरिकेकडे कोणताही ठोस एक्झिट प्लॅन दिसत नाही. अमेरिकन सैन्य प्रत्यक्ष रणांगणात उतरेल, तेव्हा इराणमध्ये सत्तापालट करणे किती कठीण आहे याची जाणीव अमेरिकेला होईल. युरोपला आता धोरणात्मक स्वायत्तता स्वीकारावी लागेल. आर्थिक स्तरावर युरोपने आधीच पावले उचलली असून भारत व ऑस्ट्रेलियासारख्या देशांशी व्यापार करार केले आहेत. युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधनाचे दर प्रति लिटर दोन युरोच्या वर गेले असून, आर्थिक विकास दर निम्म्यावर येण्याची भीती आहे. जागतिक ऊर्जा बाजारातील अस्थिरता आणि तेलाचे वाढते दर युरोपला न परवडणारे आहेत. पर्याय नसल्यामुळे युरोपीय देश आपल्यामागे फरफटत येऊन या युद्धात सहभागी होतील, हा ट्रम्प यांचा कयास फसला आहे. याउलट, होर्मुझची समुद्रधुनी सुरक्षित करण्यासाठी आणि युद्धविरामानंतर आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी युरोपीय देशांनी तयारी दर्शवली आहे. आंतरराष्ट्रीय राजकीय व्यवहार हे कायद्याच्या चौकटीतच असावेत, या अमेरिका आणि युरोप यांनीच घालून दिलेल्या मापदंडांची आठवण आता युरोपीय देश अमेरिकेला करून देत आहेत. जागतिक सत्तासंतुलनात अमेरिकेसोबत युरोप नसणे, ही बाब म्हणजे शक्ती असूनही ती प्रभावीपणे प्रदर्शित करण्याच्या प्रयत्नात ट्रम्प अपयशी ठरण्यासारखे आहे. लष्करी क्षमता मर्यादित असली तरीही, अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांवर आजही युरोपीय देशांचे वर्चस्व कायम आहे. आज युरोपमध्ये जी एकता दिसत आहे, ती परिस्थितीच्या दबावातून निर्माण झाली असली तरी ती टिकवून ठेवणे युरोपच्या हिताचे आहे. कारण युरोपची जबाबदारी केवळ व्यापारी भागीदार बनण्यापुरती मर्यादित नसून, जगातील लोकशाही राष्ट्रांना दिशादर्शन करण्याची देखील आहे.

हिंदू हिजाब : पालकांनो, आता तरी जागे व्हा!



दिवसागणिक उघडकीस येणारी लव्ह जिहादची, आता कॉर्पोरेट जिहाद ची प्रकरणे आपण बघतो, ऐकतो, वाचतो. त्याबद्दल मतप्रदर्शन करताना अगदी खेद, संताप, चीडही व्यक्त करतो. पण, त्यापुढे हिंदू मुलामुलींचे पालक म्हणून तुम्ही-आम्ही खरंच काही कृती करतो का? प्रसंगी मुलींना सावध हरिणी सावध गं... असा काळजीपोटी इशारा देतो, थोडेसे दटावतो, दरडावतोही. पण, मुलींनी वर्तणुकीत बदल करावा म्हणून आपण स्वतः, कुटुंबातील अन्य सदस्य जीवनशैलीत खरंच काही बदल आत्मसात करतात का? यांसारख्या प्रश्नांची उत्तरे मिळाली की आपसुकच लक्षात येते की, आपणही धार्मिकतेवर एकप्रकारे काळा बुरखा पांघरुन निद्रिस्त आहोत. म्हणूनच या हिंदू हिजाब पासून जागे होण्यासाठी पालकांना कळकळीचे आवाहन . अमरावतीत मोहम्मद अय्याज तन्वीर या १९ वर्षांच्या मुलाचं नाव सध्या देशभरात त्याच्या कारनाम्यांमुळे चर्चेत आहे. या तरुणाने तब्बल ३५० हून अधिक अश्लील व्हिडिओ क्लिप व्हायरल केल्या आणि जवळपास १८० हून जास्त अल्पवयीन हिंदू मुलींचं लैंगिक शोषण केले, हे विदारक सत्य चौकशीअंती समोर आले. या सर्व आरोपांवर वरचढ प्रकार असा की, याबाबत कोणतीही फिर्याद दाखल केलेली नाही. सर्व मुलींचे अर्धनग्न व्हिडिओ सर्वत्र व्हायरल झाले, तरी कोणीही तक्रार दाखल करायला पुढे धजावले नाही. तरी, या विषयाची गंभीर दखल घेत अनिल बोंडे यांनी स्वतः हा मोहम्मद अय्याज तन्वीर याच्याविरोधात तक्रार दाखल केली आणि मग सर्व सूत्र फिरायला लागली, नाही तर, तोपर्यंत हा प्रकार कदाचित असाच सर्रास सुरू होता. दुसरा उघडकीस आलेला तितकाच धक्कादायक प्रकार हा नाशिकच्या टीसीएस कंपनीतला. तिथेही हिंदू मुलींचे लैंगिक शोषण आणि धर्मांतरणाचा दबाव. कंपनीची एचआर हेड निदा खान, अश्विनी चेनानी हिने नाशिकमध्ये सुरू केलेल्या लैंगिक शोषणाचा हा प्रकार थेट मलेशियामध्ये या मुलींच्या देहविक्रीसंदर्भात जोडला जात आहे.

किती भयाण आहे बघा! या सर्व प्रकारांबद्दल गेल्या काही दिवसांत सर्व अंगाने चचार्ही झाली. मुस्लीम धर्म, त्यांची शिकवण, त्यांची कट्टरता यांविषयी आपण जागोजागी भाष्य करतो, ऐकतो. पण, मग खरोखरीच त्यांच्या या कृत्यासाठी सर्वस्वी तेच १०० टक्के जबाबदार आहेत? आपण हिंदू म्हणून कुठेतरी चुकत आहोत; कमी पडलो आहोत, ही जाणीव आपल्याला नेमकी केव्हा होणार? हिंदू म्हणून माझीही काहीतरी जबाबदारी आहे, याची जाणीव होण्यासाठी आणखीन किती वेळ लागणार? त्यातच हे सगळं भाजप सत्तेत आल्यापासून जास्त सुरू झालंय; नाही तर आधी असं होत न्हवतं, असं मानणारे बरेच बुद्धिजीवी मी ठिकठिकाणी पाहिले आहेत. पण, खरोखरीच आपलं काहीच चुकलं नाही का? हिंदू मुली इतया नादान आणि बावळट आहेत का, की कोणीही त्यांना फसवेल आणि आपण त्यांच्या जाळ्यात अडकू? यांसारख्या बऱ्याच बाबींचा गांभीर्याने विचार हा व्हायलाच हवा.

आणि या सगळ्याचं पहिले प्रमुख कारण म्हणजे, घरातील मुलामुलींचा पालकांशी तुटलेला संवाद. दुसरे कारण : व्यक्ती-कुटुंब-समाज (राष्ट्र) या तिन्ही घटकांचा सुसंवाद न झाल्याने हा विकृत प्रकार घडत आहे आणि यातूनच काही प्रश्नांची उत्तरं आपणही आपल्याला स्वतःला विचारायला हवी. खरंच आपण या प्रश्नांची स्वतःला उत्तरं विचारून बघू.

१) मी स्वतः हिंदू असल्याचा अभिमान बाळगतो का? २) माझं कुटुंब हिंदू आहे, म्हणूनही मी अभिमान बाळगतो का? ३) मी स्वतः किती वेळा आपल्या जवळपासच्या देवळात जातो? (दररोज/आठवड्यातून एकदा/महिन्यातून एकदा/कधीच नाही.) ४) कारण, आपल्याला असंही शिकवलं जातं की, देव केवळ देवळात नाही, बरोबर ना? ५) हिंदू म्हणून आपण किती वेळा आपल्या देवाची मनोभावे पूजा करतो आणि त्यासंदर्भातील भजन-कीर्तन-आरती करतो? ६) माज्यासोबत घरातील लहान-थोरांना सर्वांना देवळात जायची सवय आहे? ७) या सर्व धर्मकार्यासाठी घरात देव्हारा आहे का आणि देव्हार्यात हिंदू देवीदेवता आहेत का? ८) नित्यनियमाने घरातील प्रत्येकजण मनोभावे देवाची आरती आणि पूजा करतो का? ९) दिवसातून एकदा आपण सहकुटुंब, सामूहिक जेवण करतो का? जेवताना टीव्ही-मोबाईल न वापरता, एकत्र एकमेकांशी गप्पा मारत जेवतो का? १०) दिवसातील किमान अर्धा तास सामाजिक बांधिलकी म्हणून सामाजिक कार्यात हातभार म्हणून काम करतो का? ११) बाकी सोडा, घरात आपल्या मुलांना आपल्या धर्माचं आचरण करण्यासाठी किमान अर्धा तास सोबत बसून प्रवृत्त करतो का? १२) त्यांच्यासोबत बसून धर्माचरण करतो का? १३) आमच्या वेळी आम्हाला योग्य शिक्षण मिळालं नाही, म्हणून आता माज्या मुलांना चांगल्या प्रकारचं शिक्षण मिळू देण्यासाठी, मी अहोरात्र प्रयत्न करतो. पण, माज्यावर जसे हिंदू धर्माचे संस्कार झाले, तसे त्याच्यावरही व्हायला हवे, म्हणून मी दररोज काय प्रयत्न करतो? १४) माझंही एक व्यक्तिगत आयुष्य आहे, एक कुटुंब आहे आणि ही कुटुंबव्यवस्था टिकविण्याची जबाबदारी मी व्यवस्थित पार पाडतोय का? १५) पुढच्या पिढीस शिक्षणासोबत धर्म-संस्कार शिकविण्याची जबाबदारी मी व्यवस्थित निभावतो आहे का? १६) आंतरधर्मीय विवाह केला, तरी चालेल, असं म्हणत मुलांना स्वैर जगण्याचे धडे मीच गिरवायला शिकवतो का? १७) मी पाश्चात्य विचार आणि आचारसरणी घरात राबवितो. मग माझा मुलगा-मुलगी माझंच अनुकरण करणार नाही का? १८) माज्या वडिलांना मराठी लिहिता-वाचता आणि बोलता येत होतं. मला थोडं-फार लिहिता-वाचता आणि बोलता येते का? १९) माज्या मुलाला नुसती भाषा बोलता येते आणि त्याच्या मुलाला शून्य. नातवाला शून्य कळणार नाही, झिरो कळेल! २०) हा आपला आलेख बरोबर आहे की चूक, याचे उत्तर तुम्ही तुमच्या मनाला देत आहात का? २१) त्यातल्या त्यात मुलींसाठी अजून काही सवलती. २२) आईपेक्षा वडिलांचा मुलीवर अधिक जीव असतो. मग जे पाहिजे ते लगेच हजर केलं जातं. हे खरं की खोटं? २३) वंशाला दिवा हवा, म्हणून स्त्रीभ्रूणहत्या सर्रास होत होत्या का? २४) मग त्याचमुळे सध्या स्त्रियांची संख्या पुरुषांच्या तुलनेत कमी झाली आहे. २५) मग काय, आता मुलींच्या मागण्या वाढल्या, मुलांकडून त्यांच्या अपेक्षाही वाढल्या. २६) मुलाचा पगार माज्या पगारापेक्षा जास्त किंवा माज्याएवढा हवाच, असाही आजकालच्या मुलींचा आग्रह. २७) घरात कमीत कमी डस्ट बिन (सासू-सासरे) हवेत; म्हणजेच न कमावर्णाया व्यक्ती घरात नकोत, असंही मानणारा मुलींचा एक वर्ग आज समाजात दिसतो. २८) घरात काही बनवलं नाही, तर त्या पतीने स्वतः बनवून खायला घालावे, अन्यथा बाहेरून मागवून खायला घालावे, असा विचार करणाया मुलींमुळेही कौटुंबिक स्वास्थ्य आज धोक्यात आले आहे. २९) माज्या म्हणण्याप्रमाणे वागणाराच पती हवा. त्याने माझे व्यक्तिस्वातंत्र्य अडचणीत आणू नये, ही काही मुलींची विचारसरणीही संसारात अडसर ठरणारी. ३०) माज्या व्यक्तिगत नातेसंबंधांत, पाश्चात्य राहणीमानात अडीअडचणी आणू नये वगैरे वगैरे विचार... ३१) आता असे विचारच जर काही हिंदू मुली करणार असतील, तर आपण कोणत्या तोंडाने इस्लामीकरण थांबवू शकू? ३२) हातात बांगड्या, कपाळावर कुंकू, पायात जोडवी, अंगभर सुंदर साडी, केसात सुंदर मोर्गयाचा गजरा हे सगळं इतिहासजमा झालंय, असं असताना अपेक्षा का? ३३) मुघलांनी ७०० वर्षे आमच्यावर राज्य केलं. इंग्रजांनी १५० वर्षे राज्य केलं आणि आमच्या आई-वडिलांचं मम्मी-पप्पा असं नामकरण झालं. काय गमावलं आपण? ३४) विचार करा, आचार-विचार आम्ही दोन्ही गमावले. ३५) आणि वरुन काय तर म्हणे, तर ही सरकारची जबाबदारी आहे! ३६) आपला धर्म टिकवणं, ही एकटी सरकारची जबाबदारी कशी? ३७) आपल्या रुढी-परंपरा आपणच जपायला हव्यात, असं म्हणत, विचार न करता रूढी-परंपरा बंद कुणी केल्या? ३८) आपणच आपल्या मुलींना आपला धर्म पाळायला शिकविला पाहिजे; नाही तर त्या इतर धर्मीयांना आपलेसे करण्यास स्वतःहून तयार होतील; हे आपण पाहातच आहोत. ३९) या फसवलेल्या मुलींची मॉक टेस्ट घ्यायला हवी. त्यांच्या विचारांतील कमतरता अभ्यासायला हवी; तेव्हा आपल्या चुका आपल्यासमोर येतील.

४०) त्यांना घरातून बाहेर जाताना घरातल्यांनी कोणी त्यांना कुठे जाताय, असं विचारलं नाही का? आणि त्या मोकळ्या मनाने पालकांना आपण कुठे जात आहोत, हे का सांगू शकल्या नाहीत? ४१) त्या इतका वेळ बाहेर राहिल्या, तेव्हा घरातले काय करत होते? ४२) आपला अश्लील व्हिडिओ काढला जात आहे, हे माहीत असतानाही त्या बिनधास्त कशा जगत होत्या? या सर्व गंभीर प्रश्नांची उत्तरे शोधताना मला हिंदू धमार्साठी शब्दकोशात नवीन शब्द अंतर्भूत करावासा वाटतो. तो म्हणजे, हिंदू हिजाब! सगळ्या गोष्टी अगदी लख्खपणे आपल्याला समोर दिसत आहेत.

समाजरचना बिघडत आहे. हिंदू मुली वाईट आचरण करत आहेत. तरी आम्ही आमच्या धार्मिकतेवर हा काळा बुरखा घालून निशब्द बसून आहोत. लाज-शरम सगळी मातीमोल झाली आहे. हे सगळं बघून धर्मवीर संभाजी महाराजांचं धर्मासाठीच बलिदान व्यर्थ गेलं का, असाही प्रश्न खेदाने उपस्थित करावासा वाटतो. गुरु गोविंद सिंग, महाराणा प्रताप आणि बरेच, यांचं बलिदान व्यर्थ गेलं का? हिंदू धर्म टिकून राहावा, म्हणून जोहार करणाऱ्या सर्व वीरांगनांचं बलिदान एकीकडे आणि हिंदू हिजाब दुसरीकडे! भारतमातेच्या अजून किती हिंदू मुलींची अब्रू अशी वेशीवर टांगलेली पाहायची बाकी आहे? आता तरी जागे व्हा!

राजीनाम्याचे प्रश्नोपनिषद



न्या. वर्मा यांच्या घरी आढळलेल्या नोटा कोठून आल्या किंवा त्यामागे एखादे भ्रष्टाचारासारखे प्रकरण आहे का, असे विषय जनतेसाठी गुलदस्तातच राहणार का आणि न्यायमूर्ती हे कायद्यापेक्षा वर आहेत का, असे प्रश्न जनतेला पडल्यास नवल नाही.घरी नोटांची पुडकी आढळल्याने वादात सापडलेले न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या विरोधात सुरू असलेल्या महाभियोगाचा प्रश्न निकाली निघाला असला, तरी या प्रकरणाने न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचार, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांबाबत अनेक प्रश्नचिन्हे उपस्थित केली आहेत.लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी नेमलेल्या चौकशी समितीपुढे बाजू मांडण्याच्या दिवशीच न्या. वर्मा यांनी राजीनामा देणे पसंत केले.

दिल्ली उच्च न्यायालयात न्यायमूर्ती असताना त्यांच्या सरकारी निवासस्थानी लागलेल्या आगीत अग्निशामक विभागाच्या जवानांना नोटांची पुडकी आढळली. या प्रकरणामुळे साऱ्या देशात खळबळ उडाली. त्यानंतर त्यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली झाली. मात्र, त्यांच्याकडे न्यायिक कामकाज सोपवण्यात आले नव्हते; तसेच तेथील वकील संघटनांनीही त्यांच्या नियुक्तीला विरोध केला.

सर्वोच्च न्यायालयाच्या चौकशीतही जळीत नोटांबाबत प्रश्नचिन्हे उपस्थित झाली ; मात्र न्या. वर्मा यांनी या नोटांशी आपला संबंध नसल्याचा पवित्रा घेतला. न्यायमूर्तींना पदावरून हटवण्यासाठी संसदेमध्ये महाभियोग चालवावा लागतो; त्यानुसार न्या. वर्मा यांच्या विरोधात लोकसभा आणि राज्यसभेतही महाभियोगाचे प्रस्ताव सादर झाले. राज्यसभेत विरोधकांचा प्रस्ताव स्वीकारल्याने अतिवरिष्ठ नेतृत्व नाराज झाल्याने जगदीप धनखड यांना उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा द्यावा लागला आणि लोकसभेत ही प्रक्रिया सुरू झाली. याविरोधात न्या. वर्मा यांनी केलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतर महाभियोगाला सामोरे जाण्याशिवाय त्यांच्यापुढे पर्याय राहिला नाही. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी राजीनामा दिला. यापूर्वीही महाभियोग दाखल झालेल्या तीन न्यायमूर्तींनी राजीनामे देऊन संभाव्य कारवाई टाळल्याची उदाहरणे आहेत.

अर्थात, सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीकडील चौकशी अजूनही प्रलंबित आहे. भ्रष्टाचाराच्या टीकेवरून न्यायपालिका अतिसंवेदनशील राहिली आहे. नुकतेच या विषयावरील एका धड्यावरून सर्वोच्च न्यायालयाने संबंधितांना फैलावर घेऊन क्रमिक पुस्तक मागे घेण्याचा आदेश दिला होता; न्यायमूर्तींवरील अशा आरोपांबाबतही तशीच धडाडी आणि पारदर्शकता दिसून आली, तरच जनतेचा न्यायसंस्थेवरील विश्वास टिकून राहील, याचीही जाणीव ठेवली पाहिजे.

कुंभ हवा... पण करवती आवरा!

धर्म-अध्यात्माचा जागतिक उत्सव असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा भाग म्हणून नाशिक महानगरपालिका आणि प्रशासकीय यंत्रणा यांनी पुन्हा एकदा वृक्षराजीकडे मोर्चा वळवला आहे. पुरातन, डेरदार वृक्षांची निष्ठूर कत्तल सुरू आहे, ज्यामुळे 'हरित नाशिक' ही ओळख पुसली जाण्याची भीती आहे. दुर्दैवाने या खेपेला या त्याविरोधात लोकचळवळ उभी राहताना दिसत नाही. निवडक पर्यावरणवादी वगळता सारेच हताशपणे बघत आहेत. हे सारे शहराच्या मुळावर उठणारे आहे. मात्र, सत्ताधारी राजकीय व्यवस्था आणि बाबूशाहीच्या संगनमतापुढे जणू सारेच हतबल झाल्याचे दिसते. काही महिन्यांपूर्वीच तपोवनातील अठराशे झाडे तोडण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर यावरून बरेच 'रामायण' घडल्यानंतर हा विषय 'ठंडा करके खाओ' नीतीनुसार हाताळण्यात आला. आता कोणती निवडणूक नसल्याने कसला अडथळाही नाही. त्यामुळे शहरभरातील रस्ते खोदल्यानंतर आता वृक्षांची कत्तर सुरू आहे. त्यासाठी विकासकामे आणि रस्ते रुंदीकरणाचे कारण दिले जाते. तपोवनातील संभाव्य वृक्षतोडीबाबत हरित लवादाने गंभीर निरीक्षण नोंदवले, नेमके त्याच दिवशी या वृक्षसंपदेवर चाल केली गेली. शेकडो यांत्रिक करवती, यंत्रे, ट्रक व अन्य सामग्रीसह तगडा फौजफाटा मैदानात उतरला आहे. आठ-दहा दिवसांत हजारेक झाडांचे नामोनिशाण मिटविण्याचा चंग यंत्रणेने बांधलेला दिसतो. खुद्द मुख्यमंत्री नाशिकचा कुंभमेळा पर्यावरणपूरक, नशामुक्त व वैश्विक ठरणार असल्याचे सांगतात. संस्कृती आणि परंपरेचा सन्मान राखत एकजुटीने पुढे जाण्याची ग्वाही ते देतात. प्रत्यक्षात मात्र या सोहळ्यासाठी महापालिका आणि कुंभमेळा प्राधिकरण झाडांवर वरवंटा फिरवत आहेत. सिंहस्थासाठी शहराची नवी ओळख बनविताना जुनी ओळख मात्र पुसली जात आहे. केवळ पर्यावरणालाच नव्हे, तर नाशिकच्या लौकिकाला नख लावण्याचे उद्योग सुरू आहेत. काँक्रिटीकरणाच्या विकासाची फळे चाखताना, खरीखुरी फळेफुले भुईसपाट केली जात आहेत. काही लोकांना या वृक्षतोडीच्या विरोधात शड्डू ठोकायचे आहेत; परंतु सनातन परंपरेच्या आणाभाका दिल्या जात असल्याने ह्यतोंड दाबून बुक्क्यांचा मारह्ण अशी त्यांची अवस्था झाली आहे.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,२८ एप्रिल २०२६ ते ०४ मे २०२६

'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली ६० लाखांची फसवणूक

महिलेला मालमत्ता विकायलाही भाग पाडले



बनावट पोलिसांचा कॉल; 'डिजिटल चौकशी'च्या नावाखाली धमक्या

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महिलेच्या पतीच्या निधनानंतर साधारण महिनाभराने हा प्रकार सुरु झाला. तिला एका व्यक्तीकडून व्हिडिओ कॉल आला. त्याने स्वतःला दिल्ली पोलिस अधिकारी असल्याचे सांगितले आणि तिच्या आधार कार्डशी जोडलेल्या बँक खात्यातून १.५ कोटी रुपयांच्या मनी लॉन्डरिंगचा व्यवहार झाल्याचा आरोप केला. महिलेने अधिकारक्षेत्राबाबत प्रश्न विचारताच कॉल दुसऱ्या व्यक्तीकडे वळवण्यात आला. त्याने स्वतःला मुंबई पोलिसांचा वरिष्ठ अधिकारी म्हणून ओळख करून दिली. त्यानंतर धमक्यांचा सूर वाढवत तिला अटक होण्याची भीती दाखवली आणि 'डिजिटल चौकशी'च्या नावाखाली मानसिक दबाव आणला.

मुंबई। मुंबईतील पश्चिम उपनगरात राहणाऱ्या ५८ वर्षीय महिलेला सायबर फसवणुकीचा मोठा फटका बसला आहे. स्वतःला पोलिस अधिकारी सांगणाऱ्या भामट्यांनी 'डिजिटल अरेस्ट'चा बनाव रचत तब्बल ६० लाख रुपये उकळले. खोट्या मनी लॉन्डरिंग प्रकरणाची भीती दाखवत तिला मालमत्ता विकून पैसे देण्यास भाग पाडण्यात आले. गेल्या काही काळापासून अशा प्रकारच्या सायबर फसवणुकीच्या घटना वाढत असून, 'डिजिटल अरेस्ट'सारखी कोणतीही अधिकृत प्रक्रिया अस्तित्वात नसल्याचे सरकारकडून वारंवार स्पष्ट करण्यात आले आहे. तरीही भामटे नागरिकांना भीती दाखवून जाळ्यात ओढत आहेत. मालमत्ता विकायला भाग पाडले मृत पतीने घेतलेल्या कर्जाच्या ओझ्याखाली असलेल्या या महिलेला, कर्ज फेडल्यास तिची निर्दोषता सिद्ध होईल, असे भामट्यांनी पटवून दिले. इतकेच नव्हे, तर तिच्या मालमत्तेची माहितीही त्यांनी मिळवली आणि ती विकण्यास सांगितले. खरेदीदार न मिळाल्याने तिने आपले सोनं विकून ३५ लाख रुपये उभे केले. भामट्यांनी पाठवलेल्या व्यक्तीने तिच्या घराजवळ येऊन ही रक्कम घेतली. काही दिवसांनी तिने आणखी २५ लाख रुपये जमा केले, जे दुसऱ्या व्यक्तीकडून प्रत्यक्ष येऊन घेण्यात आले. उशिरा झाली जाणीव, पोलिसांत तक्रार काही काळानंतर संबंधित अधिकारी अचानक संपर्कात येणं बंद झाले. मात्र त्याआधीच वारंवार आणखी पैशांची मागणी होत असल्याने महिलेचा संशय बळावला होता. अखेर फसवणुकीची जाणीव होताच तिने पोलिसांत धाव घेतली असून, याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की, कोणतीही कायदा अंमलबजावणी संस्था फोन किंवा व्हिडिओ कॉलद्वारे चौकशी करत नाही किंवा पैसे मागत नाही. नागरिकांनी अशा प्रकारांपासून सावध राहावे आणि संशयास्पद कॉल्सची तात्काळ माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

सततचे टोमणे आणि लिव्हरचा आजार...

पंढरपूर ॲसिड हल्ला प्रकरणाला वेगळं वळण



पंढरपूर। पंढरपूर शहरात एका तरुणीवर ॲसिड हल्ला झाल्याच्या बातमीने मोठी खळबळ उडाली होती. मात्र, पोलिसांनी रात्रभर केलेल्या सखोल तपासानंतर या प्रकरणात एक अत्यंत धक्कादायक आणि थरारक माहिती समोर आली आहे. संबंधित तरुणीवर कोणताही हल्ला झाला नसून, तिने स्वतःच हा बनाव रचल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे. घरगुती वादातून तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे समोर आले असून, पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणाचा छडा लावला आहे. पंढरपूरात काल रात्री एका तरुणीवर अज्ञाताने ॲसिड फेकल्याची बातमी समो आली आणि संपूर्ण शहर हादरून गेलं. घटनेचं गांभीर्य ओळखून सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी तातडीने तपासाची सूत्रं हालवली. मात्र, जसा तपास पुढे सरकला, तसं सत्य समोर येऊ लागलं. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, कोणतीही संशयास्पद व्यक्ती तिथे दिसून आली नाही. पीडित तरुणीने दिलेल्या जबाबातील विसंगतीमुळे पोलिसांचा संशय बळावला. अखेर निर्भया पथक आणि डॉक्टरांच्या उपस्थितीत झालेल्या चौकशीत या मुलीने स्वतःच हा बनाव रचल्याची कबुली दिली. घरातील सततचे टोमणे आणि लिव्हरच्या आजारपणामुळे आलेल्या मानसिक तणावातून तिने हा प्रकार केल्याचे समोर आले आहे. एकीकडे महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढत असताना, पंढरपूरमधील या घटनेने पोलिसांना आरोपीला पकड्यासाठी मोठी धावपळ करावी लागत होती. मात्र, घरच्यांना धडा शिकवण्यासाठी किंवा वैयक्तिक नैराश्यातून असे टोकाचे पाऊल उचलणे किती महागात पडू शकते, हेच या घटनेतून अधोरेखित झाले आहे. सध्या या तरुणीवर उपचार सुरू असून पंढरपूर पोलिसांनी अवघ्या काही तासांत या घटनेमागचे गूढ उकलले आहे.

नेमकं काय झाले?

पंढरपूर शहरातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली असून, विठ्ठलाच्या पावन नगरीत एका 21 वर्षीय तरुणीवर भरदिवसा ॲसिड हल्ला करण्यात आला आहे. वैष्णवी सुदाम भागवत असे या दुर्दैवी तरुणीचे नाव असून, ती पंढरपूर शहराच्या मध्यवस्तीत पाणीपुरी खाण्यासाठी आली असताना हा प्रकार घडला. यावेळी एका अज्ञात हल्लेखोराने अचानक वैष्णवीच्या जवळ येऊन तिच्यावर ॲसिड फेकले आणि क्षणात तिथून पळ काढला. या अनपेक्षित आणि अमानुष कृत्यामुळे संपूर्ण पंढरपूर शहर हादरून गेले असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. शहराच्या मुख्य बाजारपेठेत आणि गर्दीच्या ठिकाणी अशी घटना घडल्याने सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले असून, या हल्ल्याने कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून पंढरपूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा करून परिसराची पाहणी केली. पोलिसांनी हल्ल्याच्या ठिकाणचे आणि आसपासच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आपल्या ताब्यात घेतले आहे. या फुटेजच्या माध्यमातून आरोपीचा माग काढण्याचे काम सुरू असून हल्लेखोराने कोणत्या दिशेला पळ काढला, याचा शोध घेतला जात आहे. अद्याप हा हल्ला नेमका कोणत्या वैयक्तिक वादातून किंवा कोणत्या कारणातून झाला, याचे गूढ कायम आहे. पोलिसांच्या विविध पथकांकडून आरोपीचा शोध घेतला जात असून लवकरच या प्रकरणाचा उलगडा होईल, असा विश्वास पोलीस प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे. पंढरपूर सारख्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी आणि तेही शहराच्या मध्यभागी अशा प्रकारे तरुणीवर हल्ला झाल्यामुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सुरक्षित मानल्या जाणाऱ्या गजबजलेल्या भागातही जर अशा प्रकारे अमानुष हल्ले होत असतील, तर महिलांनी कुठे सुरक्षित समजायचे, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. या नराधम आरोपीला लवकरात लवकर बेड्या ठोकून त्याला कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी संपूर्ण पंढरपुरातून केली जात आहे. पीडितेवर सध्या उपचार सुरू असून पोलीस प्रशासन आरोपीला पकडण्यासाठी पूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करत आहे, जेणेकरून अशा विकृत प्रवृत्तींवर दहशत बसेल.

हुंड्याच्या छळाला कंटाळून ब्लँकेटनं गळफास घेत संपवलं जीवन... सासरच्यांकडून सुनेचा हुंडाबळी



नवऱ्याकडून पीडितेकडे हुंड्याची मागणी

संबंधित प्रकरणात सनाचा विवाह हा 2024 या वर्षी शोएब, उर्फ सैफ अयुब खान (वय 30) याच्याशी झाला होता. विवाहापासून पती, सासरा नसीम आयुब खान (वय 57), सासू (वय 54) आणि नणंद समीना उर्फ सोनी अनीस खान (वय 35) हे सतत हुंड्यासाठी पीडितेकडे पैशांची मागणी करत होते, असा आरोप आहे. याच कालावधीत सनाचा मानसिक आणि शारीरक छळ केल्याचा प्रकार उघडकीस आला.

नागपूर। नागपूरमधील गणेशपेठ पोलीस ठाणे परिसरात हुंड्याच्या छळाला कंटाळून एका महिलेनं जीवन संपवलं. या घटनेनं पोलिसांनी मृत महिलेच्या सासरच्या चार सदस्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. संबंधित मृत महिलेची ओळख सना अंजुम अकील खान (वय 26) अशी आहे. या घटनेनं घटनास्थळ हादरून गेलं आहे. या असह्य छळाला कंटाळून सनाने 7 एप्रिल रोजी सायंकाळी 5:00 वाजता आपल्या राहत्या घरी एका ब्लँकेटच्या साहाय्याने गळफास घेत जीवन संपवलं. संबंधित प्रकरणाची माहिती मिळताच, गणेशपेठ पोलिसांनी पतीसह चारही आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता आणि हुंडा प्रतिबंधक कायद्याच्या कलमांन्वये गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा पोलीस पुढील तपास सुरु आहे. हा तपास पोलीस उपनिरीक्षक नीलम घोडके यांच्यामार्फत केला जात असल्याची माहिती आहे. आपण 21 व्या शतकात राहत असलो तरीही महिलांच्या सुरक्षेचा आणि हुंड्यांसारख्या प्रथांचे प्रश्न आजही समोर येऊ लागले आहेत.

नाशिकचा सुपुत्र हर्षल राजपूत यांची दमदार झेप; PSI ते API पदावर बढती



\नवी मुंबई । नाशिकच्या पोलीस दलातील कर्तव्यदक्ष अधिकारी हर्षल राजपूत यांना पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदावरून सहायक पोलीस निरीक्षक (API) पदावर बढती मिळाली आहे. त्यांच्या या दमदार झेपमुळे नाशिक शहर आणि ग्रामीण पोलीस दलात त्यांचे अभिनंदन होत आहे. नाशिक जिल्ह्याचा सुपुत्र हर्षल राजपूत यांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर पोलीस खात्यात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. सन २०१५ मध्ये Maharashtra Public Service Commissioa Exam (MPSC) परीक्षेत यश संपादन करून त्यांनी पोलीस उपनिरीक्षक (PSI) म्हणून सेवेत प्रवेश केला. सुरुवातीपासूनच कर्तव्यनिष्ठा, धाडस आणि तपासातील बारकावे ओळ खण्याची क्षमता यामुळे ते लवकरच वरिष्ठांच्या विश्वासास पात्र ठरले. ठाणे जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये कार्यरत असताना राजपूत यांनी अनेक गंभीर गुन्ह्यांचा छडा लावला. चोरी, मारहाण, फसवणूक तसेच इतर गुन्हेगारी प्रकरणांमध्ये त्यांनी प्रभावी तपास करत गुन्हेगारांना कायद्याच्या कचाट्यात आणले. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले, तर सर्वसामान्य नागरिकांमध्ये विश्वास वाढला. २०१५ ते २०२३ या कालावधीत ठाणे जिल्ह्यात उल्लेखनीय सेवा बजावल्यानंतर त्यांच्या कायार्ची दखल घेत त्यांची बदली नवी मुंबईतील पनवेल येथे करण्यात आली. याचबरोबर त्यांच्या उत्कृष्ट सेवेला मान्यता देत पोलीस उपनिरीक्षक पदावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) पदावर त्यांची पदोन्नती करण्यात आली आहे. हर्षल राजपूत यांची ही यशोगाथा अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत असून, कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा यांच्या जोरावर कोणतीही उंची गाठता येते हे त्यांनी सिद्ध केले आहे. पनवेल परिसरातही ते याच जोमाने काम करत कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

मुख्य कार्यालय - विरार

दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३

जावक क्र. ववि‌शम /कर/४६१/२०२५-२६

दिनांक - २३/०४/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरण परत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भात कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय विभागीय कार्यालय विरार येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यतः करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	मालमत्ता क्र.	पावती क्र.	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन कत्यार्चे नाव	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन नाव
1	VR08/127/80	21870	केशव बापू कानडे	अनिल दिलीप परब/ आर्या अनिल परब
2	VR08/127/53	21978	प्रसन्ना सावंत	प्रफुल्ल गोपाळ साळवी /प्रज्ञा प्रफुल्ल साळवी
3	VR08/159/19	23363	सोम्यदीप सरकार	अखिलेश त्रिपाठी/अभिषेक त्रिपाठी
4	VR08/103/16	20788	रेखा सायन्ना पितळा	आनंदा सदाशिव पाटील/ सीमा आनंदा पाटील
5	VR08/145/48	26220	दयानंद पाटील	प्रविना कमलेश जैन
6	VR08/111/72	26219	सुरेश शंकर घडसे	छाया प्रविण सावंत
7	VR08/126/317	23891	धनजय आर मिश्रा	आदित्य प्रकाश दुबे /काजल दुबे
8	VR08/89/46	23911	संकेत ठाकुर	दिक्षित दिलीप कोटकर / दिपाली दिलीप कोटकर
9	VR08/78/17	26294	विशाल भिमसेन सकपाळ	साईराज रामचंद्र डांगरे / रामचंद्र दगडू डांगरे
10	VR08/116/16		बिल्डर्स	सुनीप सत्यानंद पांडे / अनीता सुनीप पांडे
11	VR08/40/12	27384	पल्लवी प्रदीप पितळे	अस्थिता विनोद जाधव /विनोद विजय जाधव
12	VR08/33/10	27040	विनीता व्ही. चव्हाण	अमेय विजय चव्हाण
13	VR08/33/36	26938	पपाटील एन्ड नाईक असोसिएट	शशिबिंद इंद्रजीत यादव
14	VR08/184/37	26937	मंगेश टि. बेंद्रे/ सोनाली मंगेश बेंद्रे	गोकुळ सुगमचंद राठोड/अंकुश सुगमचंद राठोड
15	VR08/142/35	26813	रूपेश रविंद्रनाथ सरफरे	प्रियंका वीरेंद्र सरोज/प्रशांत वीरेंद्र सरोज
16	VR08/121/60	26812	वसंत प्रभाकर शेट्टी	प्रितोष विजयशंकर मिश्रा
17	VR08/182/182	26810	विवेकानंद दळवी	शंतनु संतोष कदम / संतोष शिवराम कदम
18	VR08/133/49	26806	उषा संतोष शेळके	योगेश विष्णु दळवी
19	VR08/166/38	26809	रूपाली माणिक शिंदे	उमेश विठोबा लाड/तन्वी उमेश लाड
20	VR08/166/25	26808	चरणजीतलाल साधुराम सैनी	नम्रता दर्शन बिरवाडकर

सही /-

सहा. आयुक्त

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

वसई-विरार शहर महानगरपालिका

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com